**अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थितीची तपासणी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग,

शासन परिपत्रक क्र.ओएफएम १०/०८/प्र.क्र.४५२/ई.

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

दिनांक : १० डिसेंबर, २००८

**पहा:** १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग समक्रमांक दिनांक १८ ऑगस्ट, २००८

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.अहत १६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दिनांक ३ नोव्हेंबर, २००८.

३) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग समक्रमांक दिनांक २६ नोव्हेंबर, २००८

४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.अहत १६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दिनांक १८ नोव्हेंबर, २००८.

**परिपत्रक**

प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहाण्याविषयी व उशिराने उपस्थित होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबत योग्य ती कारवाई करावी याबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत. तथापि, क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांच्या जागेवर नसल्याचेही आढळून आले आहे. त्यामुळे शासकीय कामकाजाचा जलदगतीने निपटारा होत नसल्याने सामान्य जनतेची कामे होत नाहीत. याबाबत सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार यांना यापूर्वी समक्रमांक दि.१८.८.२००८ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय अधिकारी/कर्मचारी कार्यालयात सकाळी वेळेवर उपस्थित राहतात किंवा नाही, तसेच ते त्यानंतर त्यांच्या जागेवर असतात किंवा नाही याबाबत तपासणी करण्यासाठी एक दक्षता पथक स्थापन करावे. तसेच उपरोक्त स्थापन करण्यात आलेल्या दक्षता पथकाने प्रत्येक महिन्यात अचानक भेट देऊन उपरोक्त बाबींची तपासणी करावी आणि त्याबाबतचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांस सादर करावा, असेही कळविण्यात आलेले आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन दिनांक ३ नोव्हेंबर, २००८ च्या शासन परिपत्रकानुसार शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची वेळेवर न येण्याची प्रवृत्ती कमी करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी शासकीय कार्यालयांना अचानक भेटी द्याव्यात, असे सूचित करण्यात आलेले आहे. अशा भेटींमधून पुरेशा समर्थनाशिवाय आढळून आलेल्या अनियमिततांबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितं विभाग/कार्यालय प्रमुखांना द्याव्यात असे सूचित करण्यात आले आहे. आता सामान्य प्रशासन विभागाने दि.१८ नोव्हेंबर, २००८ च्या परिपत्रकान्वये कळविले आहे की, शासकीय कार्यालयातील उपस्थितीची तपासणी करतेवेळी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी व श्री. अण्णा हजारे यांच्या संस्थेचा किंवा जिल्हयामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या इतर सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधीचांही समावेश करण्यात यावा. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी शासनांच्या या सूचनांची नोंद घेऊन योगय कार्यवाही वेळोवेळी करावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २००८१२१०१४५९४८००१ असा आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:- EST
आवक नं.:- ६०९२२
17 DEC 2008
विशेष नोंद बही नं.:-
कार्य विवरण नं.:-

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अ.से. धांडे)**

उप सचिव